२०३५
क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/ /०१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- १६.०८.२०१४

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती -------------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**मुक्काम ---------------------- पोष्ट --------------------**

**तालुका ---------------------- जिल्हा: यवतमाळ.**

**मार्फत :-** **गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------------------**

दिनांक ०१.०८.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. ----------------------------------------------------- ------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. -------------------------------------- खासदार / आमदार. मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका -------------------- जिल्हा-------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ----------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----------------- (सर्व)

****

# दिनांक ०१.०८.१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

दिनांक ०१. ०८ . २०१४ रोजी दुपारी १- ०० वाजता स्थायी समितीचे सभागृहात स्थायी समिती सभा घेण्यात आली. सभेला जि. प.चे खालील मा. पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी , खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा.श्री.ययाती मनोहरराव नाईक | सभापती, (स्थायी समिती) तथा उपाध्यक्ष, जि.प.यवतमाळ | मा.श्री.सुभाष म. ठोकळ | सभापती, (अर्थ व बांध.) |
| मा.श्री.मनमोहनसिंग अ. चव्हाण | सभापती, (शि व आ.) | मा. श्री.प्रभाकर रा. उईके | सभापती (स.क.स.) |
| मा.सौ.प्राजक्ताताई निमीष मानकर | सभापती, (म.व बा.क). | सन्मा. श्री. राहुल मा. ठाकरे | सदस्य |
| सन्मा. श्री. देवानंद न. पवार | सदस्य | सन्मा. श्री.अनिल भ. नरवाडे | सदस्य |
| सन्मा. श्री. अमन ह. गावंडे | सदस्य | सन्मा. श्री. दिवाकर ध.राठोड | सदस्य |
| **आमंत्रीत अधिकारी** | | | |
| डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी | मुख्य कार्यकारी अधिकारी | डॉ. शरद कुलकर्णी | अति.मु.का.अ. |
| श्री.अरुण मोहोड | उप मु. का.अ. (सा.) | डॉ. वाल्मीक इंगोले | उप शि.अ.(प्राथ.) |
| श्री. आर.जि.बिजवे (प्रति.) | उप मु. का.अ.(म.व.बा.क.) | श्री.सुरेश शहापुरकर | मु.ले.व वि.अ. |
| श्री. एस.एस.तपासे, | का.अ.बांधकाम क्र.१ | श्री. ए.एम.नितनवरे | का.अ.बांधकाम क्र.२ |
| श्री. शि.वा.वद्देवार | कार्य.अभि.(सिंचन) | श्री. के.टी उमाळकर | का.अ.(पा.पु.) |
| डॉ. डी.पी. रणमले | जि.आ.अ. (प्रभारी) | डॉ. श्री.दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधि. |
| श्री. पी.पी.देशपांडे | उप अभि. (यां.)भु.स.वि.य. | श्री.जे.आर.राठोड, | कृषि विकास अधिकारी |
| सौ. सुचिता पाटेकर | शि.अ. (प्राथ.) जि.प. यवत. | श्री.एस.जी.वसावे | शि.अ.(माध्य.) |
| श्री. एम.एम. गवई | स.ले.अ. , स.क.स. | श्री.के.एस.मसादे | अधि.अभि.म.वि.विकं. यवत. |
| श्री.अ.वि.सुने (प्रतिनिधी) | जि.ग्रा.वि.अ.यवतमाळ | श्री. सचिन चौधरी | उप अभि. PMGSY |
| श्री. व्ही.एच.गावंडे (प्रति.) | का.अ.म.जि.प्रा.यवतमाळ | श्री.मनोज निरंजने (प्रतिनिधी) | उपसंचालक सा.वनि.वि. |
| श्री. पी.ए. पांडे | कार्य.अभि.म.वि.वि.कं यवत | श्री.आर.आर. खरोडे | वि.अ.(पंचा.) |
| श्री. विजय पारवानी | स्विय सहा. मु.का.अ. | श्री.भानुदास चरडे | स्वियसहा.उप.मु.का.अ.(सा. |
| श्री. संजय गावंडे | स्वि.सहा. मा. उपाध्यक्ष | श्री.डी.जे. पाली | शा.अ.(सिंचन) |
| श्री. पी.के.भोंग | स्वि.सहा.मा.अध्यक्ष,जि.प | श्री.पवन आत्राम | स्वि.स.सभा.स.क. |
| श्री.एन.पी.कोडगीरवार | क.प्र.अ. सा.प्र.वि. | श्री. उत्तम बेजमलवार | स्वि.सहा.सभा. बांध व अर्थ. |
| श्री.श्रीकांत मडावी | कनि.सहा.सा.प्र.वि. | श्री.व्ही.पी.चहाकार | आ.सहा.जि.आ.अ. |

सभेचे अध्यक्षस्थान मा.उपाध्यक्ष जि.प. यवतमाळ यांनी स्विकारावे असे मा.सभापती (बांध.वअर्थ ) यांनी सुचविले व त्यास मा. सभापती (शि.व आ.) यांनी अनुमोदन दिले. तद्नंतर सचिवांनी मा. पदाधिकारी व सन्मा. स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष स्थायी समिती यांचे पुर्वपरवानगीने सभेचे कामकाज सुरु करण्यापुर्वी पुणे जिल्ह्यातील माळीण या ठिकाणी झालेल्या दुर्घटने मधील मृतकांना सभागृहाचे वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सभेचे पुढील कामकाज सुरु करण्यात आले.

**विषय क्र.१ : दिनांक ०९.०७.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास मंजुरी देणे.**

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी जि.प. प्रशासकीय परिसरात असलेल्या अनधिकृत कॅन्टीनचे अतिक्रमण काढणेबाबतचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर का.अ. (बांध-१) यांनी उक्त प्रकरणात न्यायालायाने पुढील तारीख ४ ऑगष्ट २०१४ दिली असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ. उमाताई वि. पिदुरकर** यांनी मागील सभेत मौजे शिंदोला ता. वणी शाळा निर्लेखनाबाबत मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर शि.अ.(प्राथ) यांनी पंचायत समिती स्तरावरून सदहु शाळेचे निर्लेखनाबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याचे सांगीतले.

**मा.उपाध्यक्ष श्री. ययाती म. नाईक** यांनी मागील सभेत पुसद तालुक्यातील प्रसुतीगृह बांधकामे अर्धवट असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का. अ. (बांध-२) यांनी अर्धवट असलेली कामे सुरू करण्यात आली असल्याचे सांगुन फक्त गवळीचे काम राहिलेले आहे असे सांगीतले.

**मा.सभापती (स.क.स) श्री. प्रभाकर रा. उईके** यांनी मागील सभेत मौजे बेचखेडा ता. यवतमाळ येथील म.ग्रा.रो.ह.यो. वृक्ष लागवडी मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी बाबतचा मुद्दा उपस्थित करुन सबंधित सचिवाने रेकॉर्ड लिहिले नसल्यामुळे ग्रामसेवकावर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी असे सांगीतले. त्यावर सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार यांनी उक्त प्रकरणी आजच कार्यवाही झाली पाहिजे असे मत व्यक्त केले असता उप मु.का.अ.(पंचा.) यांनी चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही सत्वर केली जाईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत सन २०११-२०१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती मधुन शाळा दुरुस्ती साठी जि. प. ला रु.५ लक्ष मिळाले होते परंतु बांधकाम विभागाने काम न झाल्यामुळे सदहु निधी शासनाकडे पाठविल्या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का.अ.(बांध-१) यांनी प्राप्त झालेला निधी रु.५लाख ग.वि.अ. कडे पाठविण्यात आले असल्याचे सांगीतले. **यावर सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी उक्त प्रकरणी चौकशी समिती नेमावी व ज्यांचेकडुन कामात हलगर्जीपणा झाला असेल त्यांचेवर कारवाई करण्यात यावी असे सांगीतले. **त्यावर मा.मु.का.अ.** यांनी याबाबत सा.प्र.वि.मार्फत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वित्त विभागास पत्र द्यावे व या प्रकरणात चौकशी करून अहवाल सादर करावा. तसेच मु.ले.वि.अ. यांनी जेवढे मनुष्यबळ पाहिजे तेवढे मनुष्यबळ घ्यावे व. (शाळा दुरूस्तीच्या अखर्चित निधीसह) अहवाल सादर करावा असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती, (स्थायी समिती)** यांनी सदर प्रकरण एका आठवड्यात चौकशी करून प्रश्न निकाली काढावा व सन्मा. सदस्यांना माहीती उपलब्ध करुन देण्याचे **निर्देश का.अ.(बांध-१)** यांना दिले.

दिनांक १३.०६.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालातील पुष्ठ क्र. ९ वरील परिच्छेद तिन मध्ये सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड यांनी जिल्ह्यातील खाजगी शाळातून विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी डोनेशन घेण्यात येत असल्यामुळे तुकडयांची संख्या वाढवून देण्यात यावी, असे नमुद करण्यात आले आहे त्याऐवजी जिल्हयातील खाजगी शाळातुन विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी तुकडयाची संख्या वाढवुन देण्यात यावी असे वाचावे व तशी दुरूस्ती करण्यात यावी याबाबतचे निर्देश मा. सभापती (स्थायी समिती ) जि.प.यवतमाळ यांनी सचिवास दिले.

दिनांक १३.०६.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालातील पुष्ठ क्र. ९ वरील **शेवटुन परिच्छेद क्र.२ मध्ये सन्मा. सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी महागांव येथील ग्रामीण रूग्णालय बंद असल्याचे सागीतले असे नमुद करण्यात आले आहे. त्याऐवजी महागांव येथील ग्रामीण रूग्णालय सुरू/कार्यान्वित करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता असे वाचावे व तशी दुरूस्ती करण्यात यावी याबाबतचे निर्देश मा. सभापती (स्थायी समिती ) जि.प.यवतमाळ यांनी सचिवास दिले.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यवतमाळ जिल्हयातील झरीजामणी, बाभुळगाव , महागाव, राळेगाव, कळंब, व मारेगाव या सहा तालुका मुख्यालय असलेल्या ग्रा.प.ला म.शा. ग्रा. व जलसंधारण विभाग मुंबई यांचे पत्र क्र. झेडपीबी/२०१४/प्र.क्र.३९/परा-५/१४ दिनांक ३ मे २०१४ अन्वये ग्रामपंचायतीला नगर पंचायतीचा दर्जा देण्याचे प्रस्ताव पुढील होणा-या स्थायी समिती सभेसमोर ठेवण्याबाबतचे **निर्देश उप मु.का.अ.(पंचा) यांना दिले.**

**ठराव क्र.१ :-** **दि.०९.०७.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास दुरुस्तीसह ही सभा मंजुरी प्रदान करते.**

**विषय क्र.२ :-** **शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

१.उप मु.का.अ.(सा.) यांनी शासकीय / निमशासकीय सेवांमध्ये आणि शैक्षणिक संस्थामध्ये मुस्लीम समाजास आरक्षण देण्याबाबतचे म.शा. अल्पसंख्यांक विकास विभाग शासन निर्णय क्र. अविवि २०१४/प्र.क्र. ८१ / का-७/दिनांक १९ जुलै २०१४ चे वाचन केले.

२.उप मु.का.अ.(सा.) यांनी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारीत बिंदुनामावली विहीत करणेबाबत म.शा. शा.नि. क्र. बीसीसी २०१३ / प्र.क्र. ३५४ / भाग-२/ २०१३ /१६-ब, दिनांक २४ जुलै २०१४ चे वाचन केले.

३. का.अ.(पा.पु.) यांनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनासाठी तांत्रीक मान्यता ,प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी, त्रयस्थ तांत्रीक परिक्षण व देखभाल दुरुस्ती बाबत सुधारीत मार्गदर्शक सुचना बाबतचे म.शा. पा.पु.व स्व.वि.शा.नि.क्र. ग्रापाधो/ १११४/प्र.क्र. २२/पापु-०७/दिनांक ९ जुलै २०१४ चे वाचन केले.

४.का.अ.(पा.पु.) यांनी राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची लोकवर्गणी पुर्णतः रद्द करण्याबाबत म.शा. पा.पु. व स्व.वि. शा.नि.क्र. गापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७ दिनांक ९ जुलै २०१४ चे वाचन केले.

**विषय क्र.३ :-** **जिल्हा ग्राम विकास निधी माहे जुन- २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास मंजुरात देणेबाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ.(पं.) यांनी सभेत दिली. जिल्हा ग्राम विकास निधीच्या जमा खर्चास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये स्थायी समितीची मंजूरात घेणे आवश्यक आहे. माहे जुन-२०१४ पर्यंत प्राप्त झालेल्या जमा खर्चाचे विवरण मंजूरीकरीता खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे. कृपया प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती. **सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ** यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. :-** **मुंबई ग्रा.प.अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये जि.ग्रा.वि.निधी माहे जुन- २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास ही सभा खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| | | |
|---|---|---|
| १ | महिण्यातील सुरवातीची शिल्लक | **९,९९,३०,५३५.४१** |
| २ | महिण्यातील जमा | **०,१६,७०,१५३.००** |
| ३ | एकूण जमा रक्कम रुपये | **१०,१६,००,६८८.४१** |
| ४ | महिण्यात झालेला खर्च रक्कम रुपये | **निरंक** |
| ५ | महिना अखेर शिल्लक रक्कम रुपये | **१०,१६,००,६८८.४१** |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

## मा.अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

**विषय क्र.४ :- सन २०१४-१५मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७हे.पर्यंत जमिनधारण करणा-या शेतक-यांना ७५% अनुदानावर ताडपत्री पुरविण्याचे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत**

विषयाची माहिती कृ.वि.अ. जि.प.यवतमाळ यांनी सभेत दिली. जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७५% अनुदानावर ताडपत्री पुरविण्याचे योजनेकरिता जि.प.च्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात रु.३७,००,०००/- ची तरतुद आहे. सदर योजना म.रा. जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० मधिल अनुसुचि १ चे बाब क्र.३ नुसार राबवावयाची आहे. योजनेचा लाभ ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या सर्व साधारण शेतक-यांना दयावयाचा आहे. प्रति शेतकरी १ नग ताडपत्री पंचायत समिती स्तरावरुन देण्यात येईल. योजने अंतर्गत ताडपत्रीची खरेदी शासन दर कराराप्रमाणे करावयाची आहे.

सेस मधुन रुपये ३७,००,०००/- व शेतकरी वाटा रु. १२,३३,३३३/- अशी एकुण रक्कम रु.४९,३३,३३३/- ची योजना आहे. सदर योजना रू.४९,३३,३३३/- ची असल्यामुळे ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/ वित्त-९,मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ नुसार योजनेला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचे सभेला आहे. तरी सदर योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता विषय सभेसमोर सविनय सादर. सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) जि.प. यवतमाळ यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.3-** **ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/ वित्त-९, मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ नुसार सन २०१४-१५मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे. पर्यंत जमिनधारण करणा-या शेतक-यांना ७५% अनुदानावर सेस मधुन रुपये ३७,००,०००/- व शेतकरी वाटा रु. १२,३३,३३३/- अशी रू.४९,३३,३३३/- च्या ताडपत्री पुरविण्याचे योजनेस ही सभा प्रशासकीय मान्यता प्रदान करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.०५ : सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना७०% अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविण्याचे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

विषयाची माहिती कृ.वि.अ. जि.प.यवतमाळ यांनी सभेत दिली. जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविण्याचे योजनेकरिता जि.प.च्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात रु.३५,००,०००/- ची तरतुद आहे. सदर योजना म.रा. जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० मधिल अनुसुचि १ चे बाब क्र.३ नुसार राबवावयाची आहे.योजनेचा लाभ ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या सर्व साधारण शेतक-यांना दयावयाचा आहे.प्रति शेतकरी १० नग एचडीपीई पाईप पंचायत समिती स्तरावरुन देण्याचे प्रस्तावित आहे. योजने अंतर्गत एचडीपीई पाईपची खरेदी कृषि आयुक्तालयाचे दर कराराप्रमाणे करण्यात येईल. सेस मधुन रु.३५,००,०००/- व शेतकरी वाटा रु. १५,००,०००/- अशी एकुण रक्कम रु.५०,००,०००/- ची योजना आहे.

सदर योजना रू.५०,००,०००/- ची असल्यामुळे ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/वित्त-९,मंत्रालय मुंबई दि.३१ जानेवारी २०१३ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जि.प.चे स्थायी समितीचे सभेला आहे. तेंव्हा योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता विषय सभसमोर सविनय सादर. सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) जि.प. यवतमाळ यांनी खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. ४:-** **ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/वित्त-९, मंत्रालय मुंबई दि.३१ जानेवारी २०१३ नुसार सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर सेस मधुन रु.३५,००,०००/- व शेतकरी वाटा रु. १५,००,०००/- अशी एकुण रक्कम रु.५०,००,०००/- चे एचडीपीई पाईप पुरविण्याचे योजनेस ही सभा प्रशासकीय मान्यता प्रदान करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**